जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे




दैनिक | वर्ष १ | अंक २५४ | सोमवार, १३ एप्रिल २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

## संक्षिप्त

### अमेरिका आणि इराणची शांती वार्ता फिस्कटली

**नवी दिल्ली, ता. १२ :** गेल्या अनेक तासांपासून पाकिस्तान मधील इस्लामाबादमध्ये अमेरिका आणि इराण यांच्यात शांती वार्ता सुरु होती. या शांती वार्ताकडे संपूर्ण जगाचं लक्ष लागलं होतं. अमेरिका आणि इराणच्या शिष्टमंडळात पाकिस्तानमध्ये साधारण २१ तास चर्चा झाली. परंतु आता ही वार्ता फिस्कटल्याची माहिती समोर आली आहे. पाकिस्तानमधील इस्लामाबाद येथे अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या शांतता चर्चेसंदर्भात प्रसारमाध्यमांना संबोधित करताना, अमेरिकेचे उपराष्ट्रपती जे.डी. व्हान्स यांनी सांगितले की, या चर्चेतून कोणताही निष्कर्ष निघालेला नाही. आम्ही येथे प्रामाणिक हेतूने आलो होतो. परंतु इराण कराराच्या अटी स्वीकारण्यास तयार नाही, असंही जे.डी. व्हान्स म्हणाले. तसेच आम्ही अमेरिकेला परत जात आहे, जिथे मी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना या परिस्थितीची माहिती देईन, असं जे.डी.व्हान्स यांनी माहिती दिली. तर अमेरिकेच्या अवास्तव मागण्यांमुळे चर्चा निष्फळ ठरल्याचा दावा इराणकडून करण्यात आला आहे.

# ‘समर्थ’ चा ठग प्रशांत गवळी अहिल्यानगर पोलीसांच्या ताब्यात

## हजारो कोटींचा महाघोटाळा, गवळीचे साथीदार व एजंट अजूनही मोकाट?

**पुणे, ता. १२ :** समर्थ क्रॉप केअर कंपनीच्या नावाखाली शेतकरी व सर्वसामान्य गुंतवणूकदारांना प्रतिमहिना तब्बल १० टक्के परताव्याचे आमिष दाखवत कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा मुख्य सूत्रधार प्रशांत अनिल गवळी याला, पुणे शहर पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेनंतर आता अहिल्यानगर जिल्ह्यातील कोतवाली पोलिसांनी ४ कोटी १९ लाख ५६ हजार ६५० रुपयांच्या फसवणूक प्रकरणी अटक केली आहे. न्यायालयात हजर केले असता, त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. मात्र, या घोटाळ्यातील इतर प्रमुख आरोपी अद्यापही मोकाट असल्याने पुणे व अहिल्यानगर पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, या घोटाळ्यात प्रशांत गवळीची पत्नी ज्योती गवळी, नागनाथ धोंडिबा जाधव, पंडित




राठोड, दीपक कटारे, चंद्रकांत राऊत, अविष्कार सुरवसे (रा. बिजली नगर, पुणे), तसेच सुदामा दास, मोनिषा सुदामा पाने उर्फ दास, प्रकाश मंगाने (रा. सिंहगड रोड) आणि जोतीबा महादेव काटकर (रा. हडपसर) यांचाही सहभाग असल्याची नोंद तक्रारीत करण्यात आली आहे. मात्र, या सर्वांविरोधात अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याने मुख्य आरोपी अटकेत असताना इतर सहकारी मोकाट कसे? असा सवाल गुंतवणूकदारांकडून उपस्थित केला जात आहे.

प्रशांत गवळी व त्यांच्या सहकाऱ्यांनी पुणे, अहिल्यानगर, सोलापूरसह राज्यातील १२ हून अधिक जिल्ह्यांतील ४० ते ४५ हजार गुंतवणूकदारांकडून सुमारे ४ ते ५ हजार कोटी रुपयांची बेकायदा रक्कम गोळा केल्याचा आरोप आहे. या घोटाळ्याचा सातत्याने पाठपुरावा पुणे प्राईम न्यूजने केला आहे. गुंतवणूकदारांना परतावा देणे अशक्य झाल्याने सप्टेंबर २०२५ मध्ये संस्था दिवाळखोरीत गेली. त्यानंतर गुंतवणूकदारांना एक रुपयाही परत मिळालेला नाही, तर गवळी यांच्याकडून केवळ आश्वासने देण्यात आली आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, समर्थ क्रॉप केअर कंपनीने फक्त २० महिन्यांत गुंतवणुकीवर दुप्पट परतावा असे आमिष दाखवत शेकडो गुंतवणूकदारांना जाळ्यात ओढले. या योजनेअंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील गुंतवणूकदारांची ४ कोटी १९ लाख ५६ हजार ६५० रुपयांची फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले आहे. तक्रारीनंतर कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आणि गवळी याला अटक केली.

### संपूर्ण रॅकेट उघड करा, सर्व आरोपींना अटक करा

समर्थ क्रॉप केअर प्रकरणातील कोट्यवधींच्या फसवणुकीनंतर गुंतवणूकदारांचा संताप उफाळून आला आहे. या घोटाळ्यात इतर संचालक, एजंट आणि संबंधित व्यक्तींचाही सहभाग असतादेखील पोलिसांकडून आतापर्यंत केवळ कंपनीचा चेअरमन प्रशांत गवळी यालाच अटक झाली आहे. केवळ एका व्यक्तीवर कारवाई न करता संपूर्ण रॅकेट उघड करून सर्व आरोपींना अटक करण्यात यावी अशी मागणी गुंतवणूकदारांनी पोलीस प्रशासनाकडे केली आहे.

### पुणे प्राईम न्यूजची भूमिका ठरली महत्त्वाची

पुणे प्राईम न्यूजने समर्थ क्रॉप केअर कंपनीच्या संशयास्पद व्यवहारांबाबत वेळोवेळी बातम्या प्रसिद्ध करून जनजागृती केली. या बातम्यांमुळे अनेक संभाव्य गुंतवणूकदार सावध झाले असून, मोठ्या प्रमाणातील आर्थिक फसवणूक टळण्यास मदत झाली आहे. समाजहिताच्या दृष्टीने केलेल्या या पत्रकारितेमुळे अनेकांचे संसार वाचल्याची भावना गुंतवणूकदारांनी व्यक्त केली आहे. मात्र, पोलीस प्रशासनाकडून अद्याप या घोटाळ्याबाबत अधिकृत व सविस्तर माहिती समोर आलेली नाही. तसेच इतर आरोपींवरही ठोस कारवाई न झाल्याने गुंतवणूकदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. आपले गुंतवलेले पैसे परत मिळणार की नाहीत, या चिंतेत अनेक गुंतवणूकदार सध्या आहेत.

### पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

समर्थ क्रॉप केअर घोटाळ्यात मुख्य आरोपी अटकेत असतानाही इतर आरोपींवर अद्याप कारवाई न झाल्याने पोलिसांच्या भूमिकेबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. कोट्यवधींच्या फसवणुकीत अनेकांचा सहभाग असतानाही केवळ एका आरोपीवरच कारवाई झाल्याने पुणे व अहिल्यानगर पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पुढील काही दिवसांत इतर आरोपी पकडले जाणार का, की त्यांना मोकळीक दिली जाणार, असा सवाल उपस्थित होत आहे. गुंतवणूकदारांचे लक्ष आता पोलीस प्रशासनाच्या पुढील भूमिकेकडे लागले आहे.

# तीन वर्षे मूळ खात्यात सेवा अनिवार्य; महसूल विभागाचा निर्णय

**पुणे, ता. १२ :** राज्याच्या महसूल विभागाने प्रशासनातील शिस्त आणि कार्यक्षमता वाढवण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राजपत्रित अधिकारी वारंवार आणि दीर्घकाळ प्रतिनियुक्तीवर जात असल्याने मूळ विभागातील कामकाजावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर ही नवी मार्गदर्शक नियमावली लागू करण्यात आली आहे.



नवीन नियमानुसार, कोणत्याही अधिकाऱ्याने प्रतिनियुक्तीचा कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर पुन्हा प्रतिनियुक्तीवर जाण्यापूर्वी किमान ३ वर्षे मूळ विभागात सेवा देणे बंधनकारक करण्यात आले आहे. हा कालावधी पूर्ण केल्याशिवाय पुढील प्रतिनियुक्तीचा प्रस्ताव विचारात घेतला जाणार नाही.

तसेच, प्रतिनियुक्तीचा कालावधीही मर्यादित करण्यात आला आहे. अधिकाऱ्यांना सुरुवातीला जास्तीत जास्त ३ वर्षांसाठीच प्रतिनियुक्तीवर जाता येईल. यामुळे दीर्घकाळ इतर विभागात राहण्याची प्रवृत्ती रोखण्याचा उद्देश आहे.

हे नियम अतिरिक्त जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार तसेच भूमी अभिलेख विभागातील सर्व राजपत्रित अधिकाऱ्यांना लागू असणार आहेत. त्यामुळे या निर्णयाचा राज्याच्या प्रशासकीय यंत्रणेवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. दरम्यान, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री किंवा मंत्र्यांच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांसाठी वेगळे नियम ठेवण्यात आले आहेत. अशा अधिकाऱ्यांना जास्तीत जास्त ५ वर्षांपर्यंत प्रतिनियुक्तीवर राहता येणार आहे. त्यापुढील कालावधीसाठी मुख्यमंत्र्यांची विशेष मंजुरी आवश्यक राहील. विशेष परिस्थितीत प्रतिनियुक्तीच्या कालावधीत केवळ १ वर्षाची मुदतवाढ दिली जाऊ शकते. मात्र, यासाठी संबंधित अधिकाऱ्याने मूळ विभागाची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य आहे. महसूल विभागाच्या या निर्णयामुळे मूळ विभागातील कामकाजाला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात असून, प्रशासनातील जबाबदारी आणि उत्तरदायित्व अधिक मजबूत होणार असल्याचे मानले जात आहे.

# वंदे भारत स्लीपरने मुंबई–बंगळूर प्रवास आता फक्त १३ तासांत

**पुणे, ता. १२ :** पुणेकरांसाठी मुंबई -बंगळूर मार्गावर वंदे भारत स्लीपर एक्स्प्रेस सुरू करण्यास रेल्वे मंत्रालय यांनी मंजुरी दिली आहे. ही गाडी पुणे मार्गे धावणार असून प्रवासाचा वेळ सुमारे ५ तासांनी कमी होणार आहे.




सध्या पुणे ते बंगळूर प्रवासासाठी उद्यान एक्स्प्रेसला १८ तास १५ मिनिटे आणि कोईम्बतूर एक्स्प्रेसला १९ तास २० मिनिटे लागतात. नव्या वंदे भारत स्लीपर एक्स्प्रेसमुळे हे अंतर सुमारे १३ तासांत पार केले जाणार आहे. ही गाडी पुणे, सोलापूर आणि वाडी मार्गे धावणार असून दौंड ते गुंटकलदरम्यानचा मार्ग ताशी १३० किमी वेगासाठी सक्षम करण्यात आला आहे. या गाडीत प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी कवच प्रणाली बसवण्यात आली आहे. तसेच आधुनिक शिड्या, कुशनिंग असलेले बर्थ, सेन्सर-आधारित प्रकाश व्यवस्था आणि बायो-व्हॅक्युम टॉयलेट्सची सुविधा देण्यात आली आहे. गाडीमध्ये एकूण १६ डबे असतील. यामध्ये एसी थ्री टियरचे ११ डबे (६११ बर्थ), एसी टू टियरचे ४ डबे (१८८ बर्थ) आणि एसी फर्स्ट क्लासचा १ डबा (२४ बर्थ) असेल. एकूण प्रवासी क्षमता ८२३ इतकी असेल.

ही गाडी आठवड्यातून ६ दिवस धावणार असून १ दिवस देखभालसाठी राखीव असेल. मुंबई आणि बंगळूर येथून रात्री ९ च्या सुमारास प्रस्थान होणार आहे. गाडीची कमाल क्षमता ताशी १६० किमी असली तरी मार्गाच्या मर्यादिमुळे ती ताशी १३० किमी वेगाने धावेल.

# पुणे पोलिसांकडून गुन्हा नोंदणीसाठी आता एआय’चा वापर

**पुणे, ता. १२ :** पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवायला जायचं म्हटलं की, बराच वेळ जातो. मात्र, पुणे पोलिसांनी आता ‘एआय’ अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेचा आधार घेण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे तक्रारदारांचा आणि पोलिसांचा वेळ वाचणार असून, एफआयआर नोंदवण्याची प्रक्रिया आता सुसाट होणार आहे.




पारंपरिक पद्धतीने एफआयआर नोंदवण्यासाठी सध्या ३ ते ४ तास लागतात. पोलिसांना तक्रारीचा सविस्तर मजकूर हाताने किंवा टाईप करून नोंदवावा लागतो, त्यात योग्य कायदेशीर कलमे शोधावी लागतात. ही प्रक्रिया वेळखाऊ आणि थकवणारी असते. पुणे शहराचे पोलीस उपायुक्त चिलूमुला रजनीकांत यांच्या मार्गदर्शनाखाली आता ‘व्हॉइस टू टेक्स्ट’ (आवाजाचे रूपांतर मजकुरात करणे) या तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे.

नवीन प्रणालीमध्ये, पोलीस केवळ बोलून तक्रार नोंदवू शकतील. एआय तंत्रज्ञान केवळ तो मजकूर टाईपच करणार नाही, तर गुन्ह्याचे स्वरूप ओळखून त्याखाली कोणती कायदेशीर कलमे लावणे आवश्यक आहे, हे देखील सुचवेल. यामुळे पोलिसांना फक्त मसुदा तपासावा लागेल आणि एफआयआर अंतिम करता येईल.

तक्रारदाराला पोलीस ठाण्यात ताटकळत बसावे लागणार नाही. जलद कामामुळे पोलिसांवरील ताणही कमी होईल.हा प्रकल्प सध्या प्रायोगिक तत्त्वावर असून, तंत्रज्ञानामुळे एफआयआर नोंदवणे सोपे झाले असले तरी, तक्रारीतील तथ्यांची पडताळणी पोलीस अधिकारी स्वतःच करतील. त्यामुळे प्रणाली जरी एआय असली, तरी अंतिम तपास पोलिस करणार आहेत.

# ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचे निधन; वयाच्या ९२ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

**मुंबई, ता. १२ :** ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचे रविवारी सकाळी मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात निधन झाले. त्या ९२ वर्षांच्या होत्या. आशा भोसले यांच्या सदाबहार गीतांनी आठ दशकांपासून रसिकांना मंत्रमुग्ध केले होते. आपल्या चिरतरुण आवाजाने अवघ्या जगाला भुरळ घालणाऱ्या आशा भोसले काळाच्या पडद्याआड गेल्याने सिनेसृष्टीवर शोककळा पसरली आहे. शनिवारी रात्री त्यांना अस्वस्थ वाटू लागल्याने ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रविवारी सकाळी आशा भोसले यांचे पुत्र आनंद भोसले यांनी यासंदर्भातील माहिती दिली. तसेच सोमवारी (१३ एप्रिल) दुपारी ४ वाजता आशा भोसले यांच्या पार्थिवावर दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मशानभूमी येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार



करण्यात येणार आहेत. त्यांच्या निधनाने हिंदी चित्रपटसृष्टी, गायन क्षेत्र आणि कला क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.

दरम्यान, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सोशल मीडियावरून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. तर सोशल मीडियावर चाहत्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. अनेकांच्या स्टेटसवर आशाताईंना श्रद्धांजली वाहणारे पोस्टर्स पाहायला मिळत आहे.

# पेठ येथील झेडपी शाळेच्या मुलांचा मुख्यमंत्र्यांशी फ्रेंच मध्ये संवाद

## शिक्षकांच्या नाविन्यपूर्ण प्रयोगाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून दखल

**उरुळी कांचन, ता. १२ :** जिल्हा परिषदेच्या शाळा म्हटलं की डोळ्यासमोर फक्त स्थानिक भाषा येते, पण हवेली तालुक्यातील पेठ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने हा समज मोडीत काढला आहे. या शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी थेट राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी अस्खलित फ्रेंच भाषेत संवाद साधला. ग्रामीण भागातील मुलांचा हा आत्मविश्वास आणि परकीय भाषेवरील प्रभुत्व पाहून मुख्यमंत्र्यांनीही आश्चर्य व्यक्त करत विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले.



या यशाचे खरे शिल्पकार ठरले आहेत ते म्हणजे शाळेचे मार्गदर्शक शिक्षक सचिन साकोळकर सर. परकीय भाषा शिकणे अवघड मानले जात असताना, साकोळकर सरांनी आपल्या कल्पक अध्यापन पद्धतीतून ग्रामीण भागातील मुलांमध्ये फ्रेंच भाषेची गोडी निर्माण केली. त्यांच्या सातत्यपूर्ण परिश्रमामुळेच आज ही मुले जागतिक स्तरावरील भाषेमध्ये संवाद साधण्यास सक्षम झाली आहेत.

शिक्षकांच्या अशा धाडसी प्रयोगांमागे जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे भक्कम सहकार्य लाभले आहे. यामध्ये प्रामुख्याने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय नाईकडे, हवेलीचे गटविकास अधिकारी शेखर शेलार, गटशिक्षणाधिकारी हेमंतकुमार खाडे या सर्व अधिकाऱ्यांनी दिलेल्या पाठिंब्या मुळेच पेठ शाळेतील शैक्षणिक दर्जा आज ‘ग्लोबल’ झाला आहे.

दरम्यान, मराठी मातीत वाढलेली मुले जेव्हा परकीय भाषेत मुख्यमंत्र्यांशी सहजपणे बोलू लागली, तेव्हा उपस्थित सर्वच भारावून गेले होते. मुख्यमंत्र्यांनी दिलेली शाबासकीची थाप ही केवळ पेठ शाळेसाठी नाही, तर संपूर्ण जिल्हा परिषदेच्या शिक्षण व्यवस्थेसाठी गौरवास्पद ठरली आहे. सध्या सोशल मीडियासह सर्वत्र सचिन साकोळकर सर आणि त्यांच्या या हुशार विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# ७० लाखांची मदत अडकली, शिरूरमध्ये ७६० शेतकऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

**योगेश मारणे**

शिरूर, ता. १२ : ऑक्टोबर-२०२५ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस आणि अतिवृष्टी मुळे मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान झाले असतानाही शासनाकडून जाहीर करण्यात आलेली मदत अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यात जमा न झाल्याने शिरूर तालुक्यात संतापाची लाट उसळली आहे.महसूल विभागाच्या दिरंगाईमुळे तब्बल ७६० शेतकरी अजूनही मदतीच्या प्रतीक्षेत असून,नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांकडून तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

ऑक्टोबर-२०२५ मध्ये अवकाळी पाऊस व अतिवृष्टीमुळे तालुक्यातील सुमारे ४१५ हेक्टर



क्षेत्र बाधित झाले होते.या क्षेत्रावरील पंचनामे त्यावेळी तात्काळ पूर्ण झाले असले तरीही प्रत्यक्ष मदत वितरणात मोठा विलंब होत असल्याचे दिसून येत आहे. शासनाने हेक्टरी १० हजार रुपयांची मदत जाहीर करून निधीला मान्यता दिली होती,मात्र,प्रत्यक्षात सुमारे ७० लाख रुपयांची मदत अद्याप प्रलंबित असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

अहवालानुसार,आतापर्यंत केवळ ६० टक्के शेतकऱ्यांनाच मदत मिळाली असून उर्वरित शेतकरी अजूनही प्रतीक्षेत आहेत.शासनाने १५ दिवसांत मदत देण्याचे आश्वासन दिले होते,परंतु,अनेक महिन्यांनंतरही निधी न मिळाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

दरम्यान,नुकत्याच मार्च-२०२६ च्या सुरुवातीला पुन्हा गारपीट व अवकाळी पावसाने पिकांचे नुकसान झाले आहे.मागील मदत न मिळाल्याने नव्या संकटांपुढे शेतकरी हवालदिल झाला आहे.

नैसर्गिक आपत्तीची मदत वेळेत न देणे म्हणजे शासन शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहत नाही, अशी तीव्र प्रतिक्रिया ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व भाजपाच्या किसान मोर्चाचे प्रदेश सदस्य सुभाष कांडगे यांनी व्यक्त केली.तसेच,प्रलंबित मदत शासनाने तात्काळ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात जमा न केल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल,असा इशाराही कांडगे यांनी दिला आहे. सुभाष कांडगे यांनी शिरूरचे तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांच्यावरही गंभीर आरोप करत महसूल विभागाच्या दिरंगाई मुळेच मदत रखडल्याचे स्पष्ट केले. तर, तालुका कृषी अधिकारी सुवर्णा आदक यांनी कृषी विभागाकडील सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्याचे सांगितल्याने महसूल विभागाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शेतकऱ्यांच्या वाढत्या रोषामुळे प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले असून,शासन आता या प्रश्नावर किती तत्परतेने कार्यवाही करते,याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, शिरूरचे तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांच्याशी संपर्क साधला असता,त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

## सलग ३ पराभवानंतर चेन्नईचा पहिला विजय

**चेन्नई, ता. १२ :** चेन्नईच्या एम. ए. चिदंबरम स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या आयपीएल २०२६ मधील १८ व्या साम न्यात यजमान चेन्नई सुपर किंग्सने अखेर विजयाचा गुलाल उधळलाय. सलग तीन पराभवांच्या धक्क्यातून सावरत, ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखाली चेन्नईने दिल्ली कॅपिटल्सचा २३ धावांनी पराभव केला आणि स्पर्धेत दमदार पुनरागमन केलं. या विजयाचा खरा शिल्पकार ठरला तो म्हणजे यष्टीरक्षक फलंदाज संजू सॅमसन, ज्याने आपल्या बॅटने दिल्लीच्या गोलंदाजांचा अक्षरशः धुव्वा उडवला. चेन्नई सुपर किंग्स संघाला आरसीबी, पंजाब किंग्स आणि राजस्थान रॉयल्सकडून मोठ्या पराभवांना सामोरं जावं लागल होत. दिल्लीने आपला सलग दुसरा सामना गमावला. सीएसकेने २० षटकांत दोन गडी गमावून २१२ धावा केल्या. पण दिल्ली कॅपिटल्स निर्धारित षटकांत १८९ धावा करू शकली. यामध्ये ट्रिस्टन स्टब्सने ६० धावांची खेळी केली. या विजयासह, चेन्नई सुपर किंग्सने गुणतालिकेत १० व्या स्थानावरून ९ व्या स्थानावर झेप घेतली.

## संक्षिप्त

### मुलीची ट्यूशन फी मागितल्याने पतीने पत्नीला केली लाकडी काठीने मारहाण

**पिंपरी, ता. १२ :** मुलीच्या ट्यूशनची फी भरण्यास सांगितल्याचा राग आल्याने पतीने पत्नीला लाकडी काठीने मारहाण करून जखमी केले. ही घटना चऱ्होली बुद्रुक येथे बुधवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी पती आणि सासूविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. याप्रकरणी २८ वर्षीय महिलेने शुक्रवारी (ता. १०) दिघी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ८ एप्रिल २०२१६ रोजी सकाळी फिर्यादीने पतीला मुलीच्या ट्यूशनची फी भरण्यास सांगितले. याचा राग येऊन पतीने फिर्यादीला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वादावादी दरम्यान त्याने लाकडी काठीने फिर्यादीच्या पाठीवर, तोंडावर आणि डोक्यावर मारहाण केली, ज्यामुळे फिर्यादीचे डोकेफुटून रक्तस्राव झाला. यावेळी सासूनेही तिला चापटीने मारहाण करून घरातून हाकलून दिले.

### वारकरी संप्रदायात प्रतिगामी लोकांची घुसखोरी; शरद पवार यांचे परखड मत



**मुंबई, ता. १२ :** वारकरी संप्रदायात प्रतिगामी विचारसरणीच्या लोकांची घुसखोरी झाली आहे. ६० टक्के लोकांची मांडणी धर्मांध शक्तींना बळ देणारी आहे, असे परखड मत राष्ट्रवादी काँग्रेस नेते शरद पवार यांनी व्यक्त केले आहे. शासकीय महिला अधिकाऱ्यांच्या संमेलनानिमित्त एक स्मरणिका प्रकाशित करण्यात आली. यामध्ये देण्यात आलेल्या लेखात शरद पवार यांनी वारकरी परंपरेतील बदलत्या प्रवाहांवर भाष्य केले. त्यांच्या मते, वारकरी संप्रदायातील ६० टक्के लोकांची मांडणी धर्मांध शक्तींना बळ देणारी होत आहे. समतेचा आणि प्रबोधनाचा संदेश देणाऱ्या वारकरी चळवळीमध्ये अशा विचारांची वाढ होणे चिंताजनक असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

### सोलापूर जिल्ह्यात विनापरवाना पुतळा उभारल्यास गुन्हा दाखल होणार

**सोलापूर, ता. १२ :** सोलापूर जिल्ह्यात विनापरवाना पुतळा उभारल्यास थेट एफआयआर दाखल करून ४ तासात पुतळा हटवणार, असा मोठा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला आहे. यासह विनापरवाना उभारण्यात आलेल्या पुतळ्याची माहिती लपवल्यास सात दिवसात पोलीस पाटलाचे निलंबन देखील होणार असल्याची माहिती आहे. जिल्ह्यातील विनापरवाना उभारण्यात येणाऱ्या पुतळ्यांच्या प्रकरणावर जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषदेचे सीईओ यांचे संयुक्त परिपत्रक जारी करण्यात आला आहे. दरम्यान, घटनेची पूर्वकल्पना न दिल्यास ग्रामपंचायत सदस्यांच्या विरोधात देखील अपत्रतेचा प्रस्ताव सादर केला जाणार असल्याची माहिती आहे. मागील महिन्याभरात सोलापूर जिल्ह्यात विना परवानगी बसवण्यात आलेल्या पुतळा प्रकारनंतर प्रशासनाकडून हे परिपत्रक जारी करण्यात आले आहे. त्यामुळे अलीकडे घडलेल्या महापुरुषांच्या पुतळ्यांच्या प्रकरणावरून सोलापूर जिल्हा प्रशासनाने ठोस पावले उचलत थेट कारवाईचे निर्देश दिले आहे.

### पंढरपुरातील पक्षप्रवेश शिंदेंसाठी गेमचेंजर ठरणार?

**पंढरपूर, ता. १२ :** राज्यातील विधानसभा निवडणुकीला साडेतीन वर्षे अद्याप शिल्लक आहेत. असं असतानाच राजकीय स्पर्धा आतापासूनच सुरू झाली आहे. विधानसभेसाठी एकनाथ शिंदे यांनी बेरजेचे राजकारण सुरू केले आहे. म्हणूनच पंढरपुरात भगीरथ भालकेआणि अनिल सावंत यांना पक्ष प्रवेश देण्यात येत आहे. एकनाथ शिंदे यांनी आतापासूनच टार्गेट विधानसभा हे लक्ष्य ठेवले आहे. पंढरपुरात एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करत असलेले भगीरथ भालके, अनिल सावंत यांनी थेट विधानसभेचे रणशिंग फुंकले आहे. २०२९ सालचा पंढरपूरचा आमदार शिंदेंच्या विचाराचा होईल अशी घोषणा भालकेयांनी केली आहे. त्यामुळे पंढरपुरात राजकीय चुरस आत्तापासूनच सुरू झाल्याचं पाहायला मिळतंय.

### खरातचा मुक्काम आयुष्यभर कारागृहात ?

**नाशिक, ता. १२ :** नाशिकमधील विकृत भोंदूबाबा अशोक खरात याची गेल्या काही दिवसांपासून पोलिसांच्या विशेष तपास पथकाकडून रोज चौकशी सुरु आहे. या चौकशीत आतापर्यंत अनेक धक्कादायक माहिती समोर आली आहे. आता अशोक खरातवर कठोर कारवाई करण्याच्या हालचाली सुरु करण्यात आल्या आहेत. अशोक खरातकडून दोन-तीन नेत्यांच्या फोटोवर फुली मारण्यात आली होती. मात्र दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या फोटोवर फुली नसल्याची माहिती समोर आली आहे. अशोक खरात प्रकरणात सरकारला महत्वाचे पुरावे हाती लागले आहेत. त्यामुळे अशोक खरातचा मुक्काम आयुष्यभर कारागृहात राहील, अशी तगडी केस उभी करण्याचे प्रयत्न सरकारकडून सुरु आहेत, अशी केंद्रीय गृहमंत्रालयाच्या उच्चस्तरीय सूत्रांची माहिती आहे.

### सातबाऱ्यावरील पीक नोंदींसाठी नवीन नियमावली

**पुणे, ता. १२ :** ई-पीक पाहणी प्रकल्पाच्या अंमलबजावणीत होत असलेली दिरंगाई आणितांत्रिक गोंधळ दूर करण्यासाठी महसूल व वन विभागाने मोठा निर्णय घेतला आहे. नव्या शासन परिपत्रकाद्वारे सर्वच संबंधित यंत्रणांना स्पष्ट इशारा देण्यात आला असून, आता केवळ कागदी प्रक्रिया न चालता प्रत्यक्ष मैदानात उतरून १०० टक्के अचूक नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांपासून ते गावपातळीवरील कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वांना जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. नवीन निर्णयानुसार पीक पाहणीची संपूर्ण कार्यपद्धती बदलण्यात आली आहे.

# समतेचा संदेश, शिक्षणाची ज्योत! लोणी काळभोरमध्ये महात्मा फुले जयंती उत्साहात

**लोणी काळभोर, ता. १२ :** महात्मा फुले यांनी अज्ञान, अंधश्रद्धा आणि जातीय भेदभावाविरुद्ध लढा देत शिक्षणाची क्रांती घडवली. स्त्रीशिक्षणाचा पाया रचून त्यांनी समाज परिवर्तनाला नवी दिशा दिली. आजच्या पिढीने त्यांच्या विचारांचे अनुकरण करून समाजात समानता आणि बंधुता रुजवावी. असे प्रतिपादन प्राचार्य सिताराम गवळी यांनी केले आहे.

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची १९९ वी जयंती लोणी काळभोर (ता. हवेली) येथील पृथ्वीराज कपूर मेमोरियल हायस्कूलमध्ये अत्यंत उत्साहपूर्ण, प्रेरणादायी आणि विचारप्रवर्तक वातावरणात साजरी करण्यात आली. सामाजिक




समता, शिक्षणाचा प्रसार आणि स्त्रीशिक्षणाचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी या कार्यक्रमाचे विशेष आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य सिताराम गवळी यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थित शिक्षक व विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्याला अभिवादन करत विचारांचा जागर ठेवण्याचा संकल्प केला.

उपप्राचार्य विलास शिंदे यांनीही फुले यांच्या कार्याचा गौरव करत विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचे व समाजाचे भविष्य घडवावे, असे मार्गदर्शन केले. ज्येष्ठ शिक्षक दयानंद जानराव, नरसिंह जाधव, कल्पना बोरकर आणि शर्मिला साळुंखे यांनीही आपल्या मनोगतातून फुले यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले.

दरम्यान, या कार्यक्रमा दरम्यान विद्यार्थ्यांनी महात्मा फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित प्रभावी भाषणे सादर केली. घोषवाक्ये, विचार मांडणी आणि सादरीकरणामुळे संपूर्ण वातावरण प्रेरणादायी झाले होते. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, समानता आणि शिक्षणाबद्दलची प्रेरणा जागृत झाली असून फुले विचारांवर चालणारा समाज घडवूया असा संदेश देत कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## लैंगिक छळ प्रकरणात खासगी कंपनीतील अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा

**पुणे, ता. १२ :** खासगी कंपनीतील महिला कर्मचाऱ्याचा लैंगिक छळ केल्याप्रकरणी कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसह चार जणांविरोधात शिवाजीनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत एका महिलेने शिवाजीनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, आनंद राठी वेल्थ कंपनीचा मुख्य कार्यकारी अधिकारी राकेश रावल, कार्यकारी संचालक स्वप्न चक्रवर्ती, सह मुख्य कार्यकारी अधिकारी फिरोज अजीज, एचआर प्रमुख तेजल शहा आणि कार्यकारी संचालक सोनाली रावल यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३३ वर्षीय पीडित महिला शहरातील आनंद राठी वेल्थ या खासगी संस्थेत कामाला आहे. कँपनीतील कार्यकारी संचालकाने महिलेशी लगट करून तिचा विनयभंग केला. महिलेचा पाठलाग करून तिचा छळ केला. याबाबतची तक्रार कोणाला केल्यास कंपनीतून काढून टाकेल, अशी धमकी दिली. त्यानंतर, पीडित महिलेने कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसह अन्य संचालकांकडे तक्रार दिली.

त्यांनीही महिलेच्या या तक्रारीची दखल घेतली नाही. उलट सूडबुद्धीने पीडित महिलेची दुबईतील कार्यालयात बदली केली, असे महिलेने फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणातील आरोपींना अद्याप अटक करण्यात आलेली नसून, पोलिस उपनिरीक्षक जाधव या पुढील तपास करत आहेत. याबाबत आनंद राठी वेल्थतर्फे एचआर तेजल शहा यांनी प्रतिक्रिया देताना, व्यवस्थापनाने सुरुवातीच्या टप्प्यातच संबंधित कर्मचाऱ्याला पीओएसएच फ्रेम वर्कनुसार अंतर्गत समितीमार्फत तक्रार नोंदविण्याचा सल्ला दिला होता.

# सह्याद्री एक्स्प्रेसवर मध्यरात्री दरोडा; शेणोलीत सिग्नलमध्ये बिघाड करून प्रवाशांना लुटले

**सातारा, ता. १२ :** कोल्हापूरहून पुण्याकडे निघालेल्या सह्याद्री एक्स्प्रेसवर मध्यरात्री दरोडा पडल्याची धक्कादायक घटना कराड तालुक्यात उघडकीस आली आहे. कराडजवळ शेणोली रेल्वेस्टेशन परिसरात दरोडेखोरांनी रेल्वे सिग्नलमध्ये छेडछाड करून गाडी थांबवली आणि प्रवाशांना लक्ष्य करत सोने-चांदीचे दागिने, मोबाईल लुटले. या घटनेने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

दरोड्याची ही घटना सातारा व सांगली जिल्ह्यांच्या सीमेपासून काही अंतरावर मध्यरात्रीच्या सुमारास घडली. दरोडेखोरांनी प्रथम रेल्वेच्या सिग्नल यंत्रणेमध्ये बिघाड निर्माण केला. अचानक सिग्नल बंद पडल्याने सह्याद्री एक्स्प्रेस शेणोली स्टेशनजवळ थांबली. याच संधीचा फायदा घेत दरोडेखोरांनी डब्यांमध्ये



प्रवेश करून प्रवाशांना दमदाटी करत लुटमार केली. यावेळी महिला प्रवाशांच्या अंगावरील दागिने आणि मोबाईल फोन हिसकावून घेतले.

अचानक घडलेल्या या प्रकारामुळे प्रवाशांमध्ये एकच घबराट उडाली. काही प्रवाशांनी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता, दरोडेखोरांनी त्यांना दम देत गप्प बसण्यास भाग पाडले. दरोडेखोरांनी काही मिनिटांतच आपला डाव साधला आणि अंधाराचा फायदा घेत फरारी झाले. या घटनेमुळे रेल्वे प्रवासाच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, दरोड्यांची माहिती मिळताच, मिरज लोहमार्ग पोलीस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले असून, त्यांनी तपास सुरू केला आहे. रेल्वे सिग्नल यंत्रणेत नेमकी कशाप्रकारे छेडछाड करण्यात आली, याचा तांत्रिक तपासही सुरू आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, प्रवाशांचे जबाब आणि स्थानिकांकडून माहिती गोळा केली जात आहे.

# विवाह मोडल्याने तरुणीचा खून करणाऱ्या एकाला जन्मठेप

**पुणे, ता. १२ :** विवाह मोडल्याच्या कारणावरुन तरुणीवर चाकूने वार करुन खून करणाऱ्या एकाला अतिरिक्त सत्र न्यायाधीश हर्षल भालेराव यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. शरीफ रज्जाक शेख (वय -२७, रा. अश्रफनगर, कोंढवा बुद्रुक) असे शिक्षा सुनावलेल्याचे नाव आहे. आरोपी शेख याचा नाझनीन सादिक शेख (वय १८, रा. गणेश पेठ) हिच्याशी २०१८ मध्ये विवाह निश्चित करण्यात आला होता.

काही कारणांवरुन विवाह मोडल्याने शेख तरुणीवर चिडला होता. २३ जुलै २०१९ रोजी गणेश पेठेतील तरुणीच्या राहत्या घरात आरोपी शेख शिरला. त्याने तिच्यावर चाकूने वार केले. त्या वेळी तिची आई फैमिदा (वय-४५) यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा शेखने नाझनीनच्या आईवर चाकूने वार केले. त्याने केलेल्या हल्ल्यात फैमिदा जखमी झाल्या होत्या. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

दोघींना तातडीने ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांदरम्यान नाझनीनचा मृत्यू झाला. फैमिदा यांनी फरासखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. या प्रकरणी शेख याला अटक करण्यत आली. त्याच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यात आले. या खटल्यात सरकार पक्षाकडून अतिरिक्त सरकारी वकील संजय पवार यांनी नऊ साक्षीदारांची साक्ष नोंदविली. या खटल्यात नाझनीनची आई फैमिदा आणि शेजाऱ्यांची साक्ष महत्त्वाची ठरली. आरोपीने केलेला गुन्हा गंभीर स्वरुपाचा असून, त्याला कठोर शिक्षा सुनावण्यात यावी, अशी विनंती सरकारी वकील पवार यांनी युक्तिवादात केली. न्यायालयाने सरकार पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरुन आरोपीला जन्मठेप आणि हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली घटनास्थळावरुन जप्त केलेल्या चाकूवर आरोपीच्या बोटांचे ठसे आढळले नाहीत, आरोपींनी तरुणी, तसेच तिच्यावर आईवर हल्ला केला, असे म्हणणे योग्य ठरणार नाही, असा युक्तिवाद बचाव पक्षाच्या वकिलांनी केला होता. न्यायालयाने बचाव पक्षाच्या वकिलांचा युक्तिवाद फेटाळून लावला. चाकू रक्ताने माखला असल्याने बोटांचे ठसे पुसले जाण्याची दाट शक्यता असते, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवून बचाव पक्षाचा युक्तिवाद फेटाळून लावला.

# यंदाची अमरनाथ यात्रा १९ दिवस जास्त असणार, ३ जुलैपासून यात्रेला सुरुवात

**जम्मू-काश्मीर, ता. १२ :** जम्मू-काश्मीरमध्ये होणारी पवित्र अमरनाथ यात्रा यंदा ३ जुलैपासून सुरू होऊन २८ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. समुद्रसपाटीपासून सुमारे ३,८८० मीटर उंचीवर असलेल्या श्री अमरनाथ गुहा येथे दरवर्षी ही यात्रा पार पडते. यंदाची यात्रा ५७ दिवसांची असून गेल्या वर्षीच्या तुलनेत ती १९ दिवसांनी जास्त आहे.



जम्मू-काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनी ही माहिती देताना सांगितले की, यात्रेसाठी नोंदणी प्रक्रिया १५ एप्रिलपासून सुरू होईल. भाविकांना ऑनलाइन तसेच ऑफलाइन अशा दोन्ही पद्धतींनी नोंदणी करता येणार असून देशभरातील ५५४ बँक शाखांमध्ये ही सुविधा उपलब्ध असेल. यात जम्मू अँड काश्मीर बँक, पंजाब नॅशनल बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि येस बँक यांचा समावेश आहे. २९ जून रोजी ज्येष्ठ पौर्णिमेनिमित्त प्रथम पूजा होणार असून त्यानंतर यात्रेला सुरुवात होईल.

यंदा यात्रेकरूंच्या सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. प्रत्येक नोंदणीकृत भाविकाला ठऋखऊ कार्ड देण्यात येणार असून अपघाताच्या प्रसंगी १० लाख रुपयांपर्यंत विमा संरक्षण मिळणार आहे. तसेच यात्रेदरम्यान वापरल्या जाणाऱ्या घोडे-खच्चरांसाठीही ५० हजार रुपयांचा विमा संरक्षण देण्यात येणार आहे.

यात्रामार्गावर वीजपुरवठ्याची सोय, आवश्यक प्रकाशयोजना, तसेच घोडे, आणि पालखी यांसाठी प्री-पेड सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. भाविकांच्या सोयीसाठी बालटाल, पंथा चौक (श्रीनगर), नुनवान आणि चंदरकोट येथे निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे.

# महिलेचे अश्लील फोटो-व्हिडिओ इन्स्टाग्राम वर व्हायरल करणाऱ्या आरोपीला बेड्या

**लोणी काळभोर, ता. १२ :** प्रेमसंबंधातून निर्माण झालेल्या वैरातून एका महिलेचे अश्लील फोटो व व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करून तिची व कुटुंबाची बदनामी केल्याचा घटना घडली आहे. ही घटना लोणी काळभोर परिसरात घडली असून या गुन्ह्यातील मुख्य आरोपीला पोलिसांनी हिंगोली येथून शुक्रवारी (ता.१०) रात्री दहा वाजण्याच्या सुमारास अटक केली आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

सुनिल रामप्रसाद मुटकुळे (रा. अकोले, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी कदमवाकवस्ती येथील एका ३७ वर्षीय महिलेने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिडीता या घरकाम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांचे पती चारचाकी वाहन चालवून कुटुंबाला हातभार लावतात. सन २०१७ मध्ये त्या एका हॉटेलमध्ये काम करत असताना. आरोपी सुनिल मुटकुळे याच्याशी त्यांची ओळख झाली होती. ओळख वाढत जाऊन त्याचे प्रेमसंबंधात रूपांतर झाले.

काही काळानंतर आरोपी सुनिल हा गावी निघून गेला, मात्र दोघांमध्ये फोनवरून संपर्क सुरू होता. दरम्यान २०२१ मध्ये पतीसोबत वाद झाल्यानंतर पिडीता सुनिलकडे



संभाजीनगर येथे गेल्या. त्यानंतर सुमारे चार वर्षे त्या आरोपीसोबत राहिल्या. या काळात आरोपीने फिर्यादींचे परवानगीशिवाय खासगी फोटो व व्हिडिओ चित्रीत केले आहे.

दरम्यान, आरोपीकडून वारंवार होणाऱ्या त्रासाला कँटाळून फिर्यादी फेब्रुवारी २०२६ मध्ये पुन्हा आपल्या पतीकडे परतल्या. यानंतर आरोपीने सूडबुद्धीने सोशल मीडियाचा वापर करत बनावट इन्स्टाग्राम अकाउंट तयार करून महिलेचे अश्लील फोटो व व्हिडिओ व्हायरल करण्यास सुरुवात केली. आरोपीने अनेक फेक आयडीद्वारे हे फोटो नातेवाईकांपर्यंत पोहोचवण्यात आले. या प्रकारामुळे फिर्यादी व त्यांच्या कुटुंबाची समाजात मोठ्या प्रमाणात बदनामी झाली असून फिर्यादींना मानसिक धक्का बसला आहे. सुरुवातीला बदनामीच्या भीतीने पिडीता यांनी मौन बाळगले, मात्र प्रकार सुरूच राहिल्याने अखेर त्यांनी धैर्य दाखवत लोणी काळभोर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार आरोपीच्या विरोधात भारतीय न्याय संहीता कलम ७४,७५,७७,३५६ (२) माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६, ६६ (ई),६६ (क), ६७ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच, पोलिसांनी तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपीचे लोकेशन काढून हिंगोली येथून मोठ्या शिताफीने अटक केली आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने आरोपीला पोलीस कोठडीत तीन दिवसांची रिमांड ठोठावली आहे.

ही कामगिरी लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश बोराटे, पोलीस उपनिरीक्षक दिगंबर सोनटक्के, पोलीस हवालदार अण्णा माने, पोलीस अंमलदार गणेश शिंदे, अमोल जाधव, सागर कदम, गणेश खरात, सागर धायतोंडे, अशोक गिरी व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली आहे.

## माझी उमेदवारीच रद्द करण्याचे कारस्थान; ममतांचा सनसनाटी दावा



**पश्चिम बंगाल, ता. १२ :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी शनिवारी सनसनाटी दावा केला. भाजपने निवडणूक आयोगाच्या मदतीने भवानीपूर मतदारसंघातील माझी उमेदवारीच रद्द करण्याचे कारस्थान रचले. मात्र, ते कारस्थान आम्ही उधळले, असे त्या म्हणाल्या.

माझ्या विरोधात शुक्रवारी दोन खोटी प्रतिज्ञापत्रं दाखल करण्याचा प्रयत्न झाला. त्यामागे उमेदवार म्हणून माझा पत्ता कट करण्याचा डाव होता. मात्र, बंगाली जनतेच्या आशीर्वादामुळे आणि तृणमूल काँग्रेस कार्यकर्त्यांच्या सतर्कतेमुळे तो डाव अयशस्वी ठरला, असा गौप्यस्फोट मम तांनीएका प्रचारसभेत बोलताना केला. अर्थात, त्यांनी अधिक तपशील उघड केला नाही. संबंधित मतदारसंघातून भाजपचे प्रमुख नेते सुवेंदू अधिकारी त्यांच्या विरोधात विधानसभा निवडणूक लढवत आहेत. दरम्यान, मतदारयाद्यांची पडताळणी (एसआयआर) म्हणजे मोठा घोटाळा आहे. ती बाब एक दिवस नक्कीच सिद्ध होईल. एसआयआरच्या माध्यमातून जबरदस्तीने बंगालमधील ९० लाख मतदारांची नावे वगळण्यात आली. लोकशाही पद्धतीने निवडणुका जिंकण्याची क्षमता भाजपमध्ये नाही. त्यामुळे तो पक्ष गैरमार्गांनी मतं मिळवण्याचे कारस्थान करत आहे.

निकाल स्वत:च्या बाजूने लागण्यासाठी तो पक्ष इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमध्येही (इव्हीएम) फेरफाराचे तंत्र अवलंबतो. अर्थात, एक ना एक दिवस योग्य न्याय होईल. आधी विधानसभा निवडणुकीत भाजपचा पराभव होईल. त्यानंतर त्या पक्षाला केंद्रातील सत्तेवरून पायउतार व्हावे लागेल, असा इशारा ममतांनी दिला.

## बॉटलिंग प्लान्टच्या नावाखाली कोट्यवधींचा घोटाळा करणाऱ्या बापलेकाला अटक

**लोणी काळभोर, ता. २० :** लोणी काळभोर (ता. हवेली) परिसरात पाण्याच्या बॉटलिंग प्लान्टमध्ये भागीदारीच्या नावाखाली तब्बल २ कोटी ३४ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणाचा कसून तपास करत लोणी काळभोर पोलिसांनी हडपसर येथून दोघांना अटक केली आहे.

राजेश सत्यनारायण काबरा (वय ५४) आणि त्यांचा मुलगा रोहित राजेश काबरा (वय ३०) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी व्यावसायिक आनंद मदनलाल लाहोटी (रा. हडपसर) यांनी फिर्याद दिली आहे. लाहोटी हे पेट्रोल पंप व क्रीडा अकॅडमी व्यवसाय चालवतात. नोव्हेंबर २०२४ मध्ये त्यांचे नातेवाईक प्रतिक काबरा यांनी बॉटलिंग व्यवसायात ४० ते ५० टक्के नफा मिळतो असे सांगत भागीदारीचे आमिष दाखवले. त्यावर विश्वास ठेवून लाहोटी यांनी सुरुवातीला ३ लाख रुपये गुंतवून कदमवाकवस्ती येथे को-पॅकेजिंग व्यवसाय सुरू केला.

सुरुवातीला थोडाफार नफा दिसल्याने आरोपींनी स्वतःचा प्लान्ट उभारण्याचा प्रस्ताव ठेवला. स्वतःचा प्लान्ट सुरू केल्यास पूर्ण नफा मिळेल असे सांगून लाहोटी यांना मोठ्या गुंतवणुकीस प्रवृत्त करण्यात आले. १७ फेब्रुवारी २०२५ रोजी ए.पी. बेव्हरेजेस या नावाने भागीदारी फर्म स्थापन करण्यात आली. त्यामध्ये लाहोटी व प्रतिक काबरा हे समभागीदार होते, तर राजेश व रोहित काबरा यांच्यावर प्लान्ट व्यवस्थापनाची जबाबदारी सोपवण्यात आली. यानंतर प्लान्ट उभारणी, यंत्रसामग्री, परवाने आणि कच्चा माल यासाठी वेळोवेळी मोठ्या प्रमाणात रक्कम घेतली गेली. बँक व्यवहार व रोख रक्कम मिळून एकूण गुंतवणूक २ कोटी ३४ लाख २३ हजार रुपयांपर्यंत पोहोचली. जून ते ऑक्टोबर २०२५ दरम्यान प्लान्टमधून दररोज सुमारे ३ हजार बॉक्स उत्पादन होत होते आणि जवळपास ६० लाखांचा व्यवसाय झाला. मात्र फर्मच्या खात्यात फक्त ५.१९ लाख रुपये जमा झाले, उर्वरित रक्कम आरोपींनी स्वतःकडे वळविल्याचे तपासात स्पष्ट झाले.

लाहोटी यांनी हिशोब मागितल्यानंतर आरोपींकडून टाळाटाळ सुरू झाली. अखेरीस त्यांनी भागीदारी संपवून गुंतवणूक परत मागितली असता मशिनरी विकून पैसे देतो असा बहाणा करण्यात आला. मात्र प्लान्टवरील यंत्रसामग्री गायब असल्याचे उघड झाले. चौकशीत मशीनरी ६० लाखांना विकल्याचे सांगण्यात आले, पण त्याचा हिशोबही देण्यात आला नाही. जानेवारी २०२६ मध्ये सोलापूर येथे मशीन विक्रीचा प्रयत्न होत असल्याची माहिती मिळाल्यावर लाहोटी तेथे गेले. वाद झाल्यानंतर पोलिसांना पाचारण करण्यात आले. तसेच कुरकुंभ येथे ट्रकमधील मशीन हलवतानाचा व्हिडिओही समोर आला आहे.

यानंतर लाहोटी यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. भारतीय न्याय संहिता कलम ३१६(२), ३१८(४), ३ (५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर लोणी काळभोर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली. आणि राजेश काबरा व रोहित काबरा या बापलेकांना अटक केली आहे. दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने आरोपींना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. तर आरोपी प्रतिक राजेश काबरा हा फरार झाले असून पोलिसांचे एक पथक आरोपीच्या मागावर आहे.

ही कामगिरी पुणे शहर पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त अनुराधा उदमले, लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक कृष्णा बाबर, पोलीस उपनिरीक्षक दिगंबर सोनटक्के, पोलीस हवालदार चेतन कुंभार, अण्णा माने, सागर जगदाळे, पोलीस अंमलदार अशोक गिरी, सचिन सोनवणे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली आहे.

## पुण्यात १६ वर्षाच्या मुलाचा खून करणाऱ्या दोन आरोपींना पोलिसांनी केली अटक



**पुणे, ता. १२ :** पुणे शहरात पुन्हा एकदा गुन्हेगारीचा थरार उफाळून आला आहे. खडक पोलीस ठाणे हद्दीत १६ वर्षीय अल्पवयीन मुलाचा निर्घृण खून झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. ही घटना काशेवाडी परिसरातील त्रिकोणी गार्डन जवळ शनिवारी (ता.११) रात्री घडली आहे. या गुन्ह्यातील दोन आरोपींना विमाननगर पोलिसांनी मोठ्या शिताफीने अटक केली आहे.

अबूबकर अमजद खान (वय १६, रा. ए.डी. कॅम्प चौक, समर्थ, पुणे) असे खून झालेल्या मुलाचे नाव आहे. तर तुफेलअली अश्रफअली सय्यद (वय १९) आणि कमरअली सज्जदअली सय्यद (वय १९, दोघेही रा. म्हाडा कॉलनी, विमाननगर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अबूबकर खान याच्यावर काही अज्ञात इसमांनी धारदार हत्याराने सपासप वार केले. या भीषण हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला आणि उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवली. हल्लेखोर विमाननगर येथील असल्याची माहिती समोर येताच विमाननगर पोलीस स्टेशनच्या पथकाने वेगाने हालचाल करत शोधमोहीम राबवली.

या कारवाईत तुफेलअली सय्यद आणि कमरअली सय्यद या दोघांना अटक केली. त्यांच्याकडे कसून चौकशीकेली असता आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली आहे. पोलिसांनी आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेले धारदार हत्यार जप्त केले असून पुढील तपासासाठी त्यांना खडक पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कामगिरी विमाननगर पोलीस ठाण्याच्या तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक राठोड, पीएसआय घागरे, पोलीस नाईक जोगदंडे, पोलीस अंमलदार लालु कऱ्हे, हरिप्रसाद पुंडे, सागर कासार,प्रशांत सुतार, घागरे, मार्शल संजयपार्क व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली आहे.

## बड्या नेत्यांच्या फोटोंवर 'फुली'; अशोक खरात प्रकरण आणखी चिघळलं



**नाशिक, ता. १२ :** स्वत:ला 'दैवी अवतार' म्हणवून घेणाऱ्या आणि अध्यात्माच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण करणाऱ्या अशोक खरातचे काळे कारनामे आता एकामागून एक उघड होत आहेत. नाशिक पोलिसांनी स्थापन केलेले विशेष तपास पथक खरातची कसून चौकशी करत असून, तपासात समोर येणारी माहिती कोणत्याही क्राईम थ्रिलरपेक्षा कमी नाही.

अशोक खरातने केवळ धर्माचा आधार घेऊन लोकांची फसवणूक केली नाही, तर त्याने राजकीय आणि आर्थिक क्षेत्रातही आपले जाळे विणले होते. तपासादरम्यान खरातच्या घराची झडती घेतली असता, तिथे काही बड्या नेत्यांचे फोटो आढळले. धक्कादायक म्हणजे, दोन-तीन नेत्यांच्या फोटोंवर त्याने लाल फुली (द) मारली होती, जणू काही तो त्यांच्यावर 'करणी' किंवा काहीतरी विधी करत होता. मात्र, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या फोटोवर अशी कोणतीही खूण नसल्याचे समोर आले आहे.

**कारवाईचा बडगा**

केवळ पोलीसच नाही, तर आता अंमलबजावणी संचालनालय देखील या प्रकरणात उतरले आहे. खरात लोकांना बनावट अधिकारी दाखवून ईडी आणि आयकर विभागाची भीती घालत असे आणि त्यातून कोट्यवधी रुपये उकळत असे. त्याच्या खात्यातील संशयास्पद व्यवहारांची आता चौकशी सुरू आहे. दरम्यान, १५ गुन्हे अंगावर असलेल्या खरातचा आत्मविश्वास आता पूर्णपणे ढासळला आहे. चौकशीदरम्यान तो मानसिकदृष्ट्या खचलेला असून, माझं मरण आता इथेच जेलमध्ये आहे, असे तो बोलत आहे. फसवणुकीचे अनेक गुन्हे त्याने कबूल केल्याचे समजते.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

# हडपसर येथून १३ बांगलादेशी मुली केअरटेकरवर हल्ला करून फरार

**पुणे, ता. १२ :** पुण्यातील हडपसर परिसरातून एक अत्यंत धक्कादायक आणि तितकीच विचित्र घटना समोर आली आहे. महंमदवाडी रस्त्यावरील रेस्क्यू फाउंडेशन या संस्थेतून तब्बल १३ बांगलादेशी तरुणींनी नियोजनबद्ध पद्धतीने पलायन केल्याने खळबळ उडाली आहे. या घटनेदरम्यान केअरटेकर आणि सुरक्षारक्षकावर हल्ला करण्यात आल्यामुळे महिला संरक्षण गृहांच्या सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, हा प्रकार अत्यंत शिताफीने घडवून आणण्यात आला. एका तरुणीने औषध घेण्याच्या बहाण्याने केअरटेकर लक्ष्मी कांबळे यांना दरवाजा उघडण्यास भाग पाडले. दरवाजा उघडताच दबा धरून बसलेल्या इतर मुलींनी त्यांच्यावर झडप घातली. त्यांच्या हात-पाय बांधून तोंडात बोळा कोंबून त्यांना वैद्यकीय कक्षात कोंडून ठेवण्यात आले. ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली असून दृश्ये अत्यंत धक्कादायक असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, संस्थेच्या आवारात साफसफाई सुरू असल्याने मुख्य दरवाजा उघडा राहिला होता. याचाच फायदा घेत या १३ मुलींनी सुरक्षारक्षकाला बाजूला सारत, त्याचा चावा घेत तिथून पलायन केले. या घटनेनंतर काळेपडळ पोलीस ठाणे यांनी तातडीने शोधम ोहीम सुरू केली असून सय्यदनगर परिसरातून दोन मुलींना ताब्यात घेण्यात आले आहे. मात्र, उर्वरित ११ मुली अद्याप फरार आहेत आणि त्यांचा शोध सुरू आहे.

धक्कादायक बाब म्हणजे इतकी मोठी घटना घडूनही अद्याप अधिकृत गुन्हा नोंदवण्यात आलेला नाही. पोलिसांनी केवळ जनरल डायरीमध्ये नोंद केली असून यामुळे पोलिसांच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. सदर संस्था मानवी तस्करीतून सुटका झालेल्या महिलांसाठी कार्य करते. संस्थेच्या माहितीनुसार, १६ मार्च २०२४ पासून त्यांना मिळणारे पोलीस संरक्षण काढून घेण्यात आले होते. वारंवार मागणी करूनही संरक्षण पुन्हा देण्यात आले नाही, असा दावा संस्थेकडून करण्यात आला आहे.

या मुली बांगलादेशी नागरिक असून त्यांच्या मायदेशी परतण्याची प्रक्रिया १ ते २ वर्षे चालते. या विलंबामुळे त्यांच्यात नैराश्य निर्माण होत असल्याचेही संस्थेने स्पष्ट केले आहे. सध्या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे उर्वरित मुलींचा शोध घेतला जात असून या घटनेमुळे पुण्यातील महिला संरक्षण गृहांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## शिंदवणे घाटात कंटेनरमधून पोकलेन मशीन रस्त्यावर पडले

**उरुळी कांचन, ता. १२ :** उरुळी कांचन - जेजुरी रस्त्यावरील शिंदवणे घाटात जेजुरीच्या दिशेने जाणाऱ्या कंटेनरमधून पोकलेन मशीन अचानक कंटेनरमधून निसटून रस्त्यावर पडल्याची घटना घडली. शनिवारी (ता. १२) मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला असून, रात्रीची वेळ असल्याने मोठा अपघात टळला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित कंटेनर पोकलेन मशीन घेऊन घाटातून जात होता. घाटातील एका तीव्र वळणावर मशीनचे संतुलन बिघडले आणि ते थेट डांबरी रस्त्यावर कोसळले. अवजड मशीन रस्त्यावर पडल्याने मोठा आवाज झाला, ज्यामुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण होते. ही घटना मध्यरात्री घडल्याने घाटात इतर वाहनांची वर्दळ कमी होती. जर हीच घटना दिवसा किंवा वाहनांची गर्दी असताना घडली असती, तर मोठा अनर्थ ओढवला असता.

## प्राईम लाईफ



## दररोज उपमा-पोहे-इडली खाताय? फायदे की तोटेजाणून घ्या..

आजकाल हेल्दी लाइफस्टाइलकडे लोकांचा कल वाढत आहे. त्यामुळे अनेकजण नाश्त्यामध्ये उपमा, पोहे आणि इडली यांसारख्या पारंपरिक पदार्थांना प्राधान्य देत आहेत. हे पदार्थ हलके, पचायला सोपे आणि आरोग्यासाठी चांगले मानले जातात. पण हेच पदार्थ रोज खाल्ल्यास शरीरावर काय परिणाम होतो, याबाबत तज्ज्ञांनी महत्त्वाची माहिती दिली आहे.

डायटिशियन यांच्या मते, उपमा, पोहे आणि इडली हे पदार्थ मुख्यतः कार्बोहायड्रेट्सने भरलेले असतात. त्यामध्ये प्रोटीन आणि फायबरचे प्रमाण तुलनेने कमी असते. त्यामुळे जर हे पदार्थ रोज नाश्त्यात खाल्ले आणि त्यात संतुलन नसेल, तर शरीरातील ब्लड शुगर अचानक वाढते आणि नंतर लगेच कमी होते. यामुळे थोड्या वेळासाठी ऊर्जा मिळते, पण ती पटकन कमीही होते.

यामुळे सकाळी खाल्ल्यानंतर काही वेळातच पुन्हा भूक लागते, क्रेविंग्स वाढतात आणि जास्त खाण्याची सवय लागू शकते. अशा पद्धतीने जर दीर्घकाळ हा आहार चालू राहिला, तर वजन वाढणे, पोटावर चरबी साचणे आणि इन्सुलिन रेजिस्टन्ससारख्या समस्या निर्माण होऊ शकतात.

विशेषतः ज्या लोकांची जीवनशैली बसून काम करण्याची आहे, त्यांना याचा जास्त परिणाम होऊ शकतो. अनेकांना वाटतं की आपण हलका नाश्ता करतो, पण जर त्या नाश्त्यात प्रोटीन आणि फायबर नसतील, तर शरीराचा मेटाबॉलिझम मंदावतो. त्यामुळे अपेक्षित फायदे मिळण्याऐवजी नुकसान होऊ शकतं.

तज्ज्ञ सांगतात की, याचा अर्थ असा नाही की उपमा, पोहे किंवा इडली हे पदार्थ वाईट आहेत. समस्या पदार्थांमध्ये नसून, ते कसे खाल्ले जातात यात आहे. जर योग्य पद्धतीने आणि संतुलन राखून हे पदार्थ खाल्ले, तर ते खूपच आरोग्यदायी ठरू शकतात.

उदाहरणार्थ, पोहे बनवताना त्यात शेंगदाणे, अंकुरित कडधान्ये आणि भाज्या घालाव्यात. त्यामुळे प्रोटीन आणि फायबरचे प्रमाण वाढते. उपमामध्ये डाळी, पनीर किंवा बिया मिसळल्यास तो अधिक पौष्टिक होतो. इडली खाताना सांबारसोबत खाणे महत्त्वाचे आहे, कारण सांबारमध्ये डाळी आणि भाज्या असतात, ज्यामुळे पोषणमूल्य वाढते.

तसेच, नाश्त्यामध्ये प्रोटीनचा स्रोत असणे आवश्यक आहे. मांसाहारी लोक अंडी खाऊ शकतात, तर शाकाहारी लोक पनीर किंवा इतर प्रोटीनयुक्त पदार्थांचा समावेश करू शकतात. यामुळे अन्न हळूहळू पचते आणि ब्लड शुगर नियंत्रणात राहते. एकूणच, कार्बो हायड्रेट्स असलेले पदार्थ कधीही एकटे खाऊ नयेत. त्यांना प्रोटीन आणि फायबरसोबत संतुलित केल्यासच ते खऱ्या अर्थाने हेल्दी ठरतात. योग्य पद्धतीने आहार घेतल्यास उपमा, पोहे आणि इडली हे पदार्थ आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकतात.

# अमेरिका–इराणमधील चर्चा फिस्कटल्याने युद्धाची टांगती तलवार कायम

**इस्लामाबाद, ता. १२ :** गेल्या ४७ वर्षांतील सर्वात मोठी ऐतिहासिक संधी मानली जाणारी अमेरिका-इराण शांतता वार्ता अखेर कोणत्याही निष्कर्षाविना फिस्कटली आहे. पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादमध्ये तब्बल २१ तास चाललेल्या या 'हाय व्होल्टेज' चर्चेनंतर दोन्ही देशांमधील तणाव आता अधिकच चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



१९७९ नंतर पहिल्यांदाच अमेरिका आणि इराणचे प्रतिनिधी समोरासमोर बसले होते. अमेरिकेचे नेतृत्व उपराष्ट्रपती जे.डी. व्हान्स करत होते, तर इराणकडून संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बागेर गालिबाफ आले होते. ही चर्चा सुरक्षा, अर्थव्यवस्था आणि लष्करी मुद्द्यांवर केंद्रित होती. मात्र, होर्मुझ सामुद्रधुनीवरील नियंत्रण आणि युद्धभरपाई या दोन मुद्द्यांवरून दोन्ही देशांमधील संवाद अडकला. इराणने लेबनॉनवरील हल्ले थांबवण्यासह त्यांच्या गोठवलेल्या मालमत्ता मुक्त करण्याची अट ठेवली होती, जी अमेरिकेने फेटाळून लावली. जे. डी. व्हान्स यांनी स्पष्ट केले की, इराण कराराच्या अटी स्वीकारण्यास तयार नाही. दुसरीकडे, इराणने अमेरिकेच्या मागण्यांना 'अवास्तव' ठरवले आहे. विशेष म्हणजे, ही चर्चा सुरू असतानाच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडियावरून इराणला 'अपयशी देश' संबोधत डिवचले. दोन्ही शत्रूंना एका टेबलावर आणण्यात पाकिस्तानला यश आले असले तरी, अंतिमतः तो 'मध्यस्थ' म्हणून अपयशी ठरला आहे.

जर इराण आणि अमेरिका यांच्यातील तणाव असाच राहिला, तर आगामी काळात इंधन दरवाढ आणि मध्य-पूर्वेतील अस्थिरतेमुळे भारतीय अर्थव्यवस्थेवरही याचे पडसाद उमटू शकतात. आता सर्वांचे लक्ष राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या पुढील पावलाकडे लागले आहे.

## पुण्यात भोंदूकडून महिलेवर अत्याचार; ५० लाखांची फसवणूक

**पुणे, ता. १२ :** नाशिकमधील अशोक खरात, तसेच पुण्यातील ऋषीकेश वैद्य प्रकरण ताजे असतानाच एका भोंदूने दैवीशक्तीचा संचार असल्याची बतावणी करुन एका म हिलेवर बलात्कार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आले. कौटुंबिक वादात तोडगा काढण्याचे आमिष दाखवून भोंदूने महिलेवर बलात्कार केला, तसेच महिलेची ५० लाख रुपयांची फसवणूक केली. या प्रकरणी एका भोंदूविरुद्ध स्वारगेट पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणी एका भोंदूविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपी पंढरपूर परिसरातील तरटगावचा रहिवासी आहे. याबाबत एका ४२ वर्षीय महिलेने स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिलेचे पतीशी पटत नव्हते. त्यांच्यात कौटुंबिक वाद झाल्याने ती वेगळी राहत होते. महिलेची पाच वर्षांपूर्वी एकामार्फत आरोपीशी ओळख झाली. तेव्हा आरोपीने देवऋषी असल्याची बतावणी महिलेकडे केली. माझ्या अंगात दैवीशक्तीचा संचार आहे, अशी बतावणी त्याने केली. कौटुंबिक समस्या दूर करतो, असे सांगून त्याने महिलेला जाळ्यात ओढले. त्यानंतर महिलेला त्याने जाळ्यात ओढले. त्याने महिलेला स्वारगेट परिसरातील एका लॉजवर बोलावून तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर त्याने महिलेला माणगाव परिसरात बोलावून तेथील एका लॉजवर बलात्कार केला. महिलेला नोकरी, तसेच बांधकाम व्यवसायात गुंतवणूक करण्याचे आमिष दाखवून आरोपीने तिच्याकडून वेळोवेळी ५० लाख ५५ हजार रुपयांची फसवणूक केली.

## 'अफु'ची शेती करणाऱ्या शेतकऱ्याला अटक

**पुणे, ता. १२ :** पुण्यातील शिरूर तालुक्यातील एका ६६ वर्षीय शेतकऱ्याने नफ्याच्या हव्यासापोटी चक्क कायद्याची मर्यादा ओलांडली. उसाच्या शेतात कोणालाही संशय येऊ नये अशा पद्धतीने 'अफु'ची बेकायदेशीर लागवड करणाऱ्या काळूराम दशरथ थिटे या शेतकऱ्याला शिक्रापूर पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.



केंदूर येथील थिटेमळा भागात राहणाऱ्या काळूराम थिटे यांनी आपल्या उसाच्या शेतात आंतरपीक म्हणून अफुची झाडे लावली होती. ऊस उंच वाढत असल्याने त्या आडून केली जाणारी ही अंमली पदार्थांची शेती कोणाच्याही नजरेस पडणार नाही, असा त्यांचा बनाव होता. मात्र, शिक्रापूर पोलिसांच्या गुन्हे शाखेला या 'गुप्त' शेतीची पक्की माहिती मिळाली. स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे हवालदार जनार्दन शेळके यांनी याप्रकरणी फिर्याद दिली होती. पोलिसांनी जेव्हा शेतावर छापा टाकला, तेव्हा २३० झाडे पाहून अधिकारीही चक्रावून गेले.

छाप्यात पोलिसांनी २ लाख ६० हजार रुपये किमतीची सुमारे २८ किलो वजनाची अफुची झाडे जप्त केली आहेत. अंमली पदार्थ विरोधी कायद्यानुसार अफुची लागवड करणे हा अजामीनपात्र गुन्हा असून यामागे एखादे मोठे रॅकेट सक्रिय आहे का, याचा तपास आता पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ कचरे करत आहेत.

## हे स्थळ माझ्यासाठी ऊर्जास्रोत; सुनेत्रा पवारांचे अजित दादांच्या स्मारकाला अभिवादन

**बारामती, ता. १२ :** आगामी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी रविवारी बारामती येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी प्रमुख अजित पवार यांच्या स्मारकाला भेट देत अभिवादन केले. यावेळी त्यांच्यासोबत पुत्र जय पवारही उपस्थित होते. हे स्थळ माझ्यासाठी ऊर्जास्रोत आहे. जनसेवेसाठी तत्पर राहण्याची प्रेरणा देणारे हे ठिकाण आहे..! असे म्हणत सुनेत्रा पवार यांनी अजित पवार यांना अभिवादन केले.



यावर्षीच्या सुरुवातीला आपल्या मतदारसंघाकडे जात असताना झालेल्या विमान अपघातात अजित पवार यांचे निधन झाले होते. त्यांच्या निधनानंतर राज्यातील राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली. त्यानंतर सुनेत्रा पवार यांची महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्रीपदी शपथ घेतली, तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रमुखपदाची जबाबदारीही त्यांच्याकडे सोपवण्यात आली.

बारामती मतदारसंघातील पोटनिवडणूक २३ एप्रिल रोजी होणार असून मतमोजणी ४ मे रोजी होणार असल्याची घोषणा निवडणूक आयोग यांनी केली आहे. या निवडणुकीसाठी सुनेत्रा पवार यांनी गेल्या आठवड्यात उमेदवारी अर्ज दाखल केला असून त्यांनी बिनविरोध निवडणुकीचे आवाहनही केले आहे. महायुतीच्या पाठिंब्याने त्या ही निवडणूक लढवत आहेत. दरम्यान, काँग्रेसने सुरुवातीला सुनेत्रा पवार यांच्या विरोधात आकाश मोरे यांना उमेदवारी दिली होती. मात्र, अजित पवार यांच्या निधनाचा सन्मान राखत काँग्रेसने नंतर त्यांची उमेदवारी मागे घेतली.

## आशाताई पुढील पिढ्यांना प्रेरणा देत राहतील; मोदींनी वाहिली श्रद्धांजली

**मुंबई, ता. १२ :** ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचे रविवारी १२एप्रिल) दक्षिण मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात निधन झाले. वयाच्या ९२ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. आशाताईंचे निधन झाल्यानंतर, पंतप्रधान नरेंद्र म ोदी यांनी एक्सवर पोस्ट करत म्हटले की, हिंदुस्थानातील सर्वात प्रसिद्ध आणि अष्टपैलू गायकांपैकी एक असलेल्या आशा भोसलेंच्या निधनाची बातमी ऐकून खूप दुःख झाले. त्यांचा संगीत प्रवास अनेक दशकांचा होता, या दरम्यान त्यांनी भारतीय संस्कृती समृद्ध केली.



पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, त्यांच्या आवाजाने केवळ देशातीलच नव्हे तर जगभरातील लोकांच्या हृदयाला स्पर्श केला. त्यांच्या आवाजात एक अनोखी जादू होती जी नेहमीच स्मरणात राहील. त्यांच्यासोबतच्या माझ्या भेटींच्या आठवणी हृदयात कोरलेल्या राहतील. या दुःखाच्या प्रसंगी मी त्यांच्या कुटुंबियांना, प्रियजनांना माझ्या सहवेदना व्यक्त करतो. आशा भोसलेजी येणाऱ्या पिढ्यांना नेहमीच प्रेरणा देत राहतील आणि त्यांची गाणी सर्वांच्याच हृदयात कायम गुंजत राहतील.

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी प्रसिद्ध गायिका आशा भोसलेंना श्रद्धांजली वाहताना म्हटले की, आशाताईंनी आपल्या मधुर आवाजाने आणि अतुलनीय प्रतिभेने स्वतः चे वेगळेपण तर सिद्ध केलेच, त्या बरोबरीने आपल्या सुमधुर गीतांनी भारतीय संगीताला समृद्ध केले. आपल्या आवाजाने लाखो लोकांची मने जिंकणाऱ्या आशाताईंनी हिंदी, मराठी, बंगाली, तमिळ आणि गुजराती यांसारख्या भाषांमधील लोकगीतांवर अमिट छाप सोडली आहे. त्यांच्या आठवणी कायम आपल्या हृद्यात कोरलेल्या राहतील.

## शालेय बसचे भाडे आता सरकार ठरवणार; प्रताप सरनाईक यांची घोषणा

**मुंबई, ता. १२ :** विद्यार्थ्यांची सुरक्षा, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवण्यासाठी राज्य सरकार शालेय वाहतुकीबाबत अधिक कडक नियम लागू करण्याच्या तयारीत आहे, असे राज्याचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.



सरनाईक यांनी म्हटले की, राज्य सरकारने पहिली सुधारणा नियमाची मसुदा अधिसूचना जारी केली असून, यावर जनतेकडून दिवसांच्या आत आक्षेप आणि सूचना मागवण्यात आल्या आहेत. शालेय वाहतूक अधिक सुरक्षित, अधिक पारदर्शक आणि अधिक उत्तरदायी करण्यासाठी महाराष्ट्र सरकार कटिबद्ध आहे.

प्रस्तावित नियमांनुसार, शालेय बसचे भाडे प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाद्वारे नियंत्रित केले जाईल. तसेच, वाहतूकदारांना केवळ मासिक शुल्क आकारण्याची परवानगी असेल. एकरकमी आगाऊ रक्कम स्वीकारण्यास मनाई असणार आहे.

सुरक्षा, भाडे आणि सेवांशी संबंधित तक्रारींचे निवारण करण्यासाठी प्रत्येक शाळेला एक वाहतूक समिती स्थापन करणे अनिवार्य असेल. तसेच या समि तीला दर तीन महिन्यांनी (त्रैमासिक) अहवाल सादर करणे बंधनकारक असणार आहे. सर्व वाहनांमध्ये जीपीएस-आधारित वाहन ट्रॅकिंग उपकरणे, पॅनिक बटणे, सीसीटीव्ही कॅमेरे, आग शोधक आणि अलार्म यंत्रणा, तसेच सीट बेल्ट्स बसवणे अनिवार्य असेल.

एका डिजिटल देखरेख प्रणालीद्वारे वाहनांचे थेट ट्रॅकिंग, उपस्थितीची नोंद, स्वयंचलित सूचना आणि पालकांना अद्ययावत माहिती देणे शक्य होईल. ही प्रणाली राज्यस्तरीय व्यासपीठाशी जोडलेली असेल. या नियमांमध्ये पूर्व-प्राथमिक आणि प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी वाहनात एका महिला कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्यासारख्या विशेष तरतुदींचाही समावेश आहे. विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी प्रशिक्षित कर्मचारी आणि सुलभ प्रवासाची व्यवस्था यांसारख्या सुविधांचाही प्रस्ताव यात मांडण्यात आला आहे.

दरम्यान, चालक आणि इतर कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी तपासणी करणे सक्तीचे असणार आहे. शालेय वाहतुकीच्या सेवेत असलेल्या सर्व वाहनांनी तीन महिन्यांच्या आत या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

# जिंदादिल व्यक्तिमत्व हरपलं : मुख्यमंत्री फडणवीस यांची आशाताईंना श्रद्धांजली

**मुंबई, ता. १२ :** ज्येष्ठ गायिका आशाताई भोसले यांच्या निधनाने संगीत विश्वातील बुलंद आवाजाचे पर्व आज संपले आहे. मंगेशकर कुटुंबातील दुसरा तारा आणि अत्यंत जिंदादिल व्यक्तिम त्व हरपले आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आशाताईंना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. आशाताईंच्या गायन कलेतील वैशिष्ट्ये, बदल स्वीकारण्याची त्यांच्या व्यक्तिम त्वातील सहजता फडणवीस यांनी यावेळी सांगितली. तसेच आकाशवाणीवरील कार्यक्र मावेळच्या आठवणींना उजाळा दिला.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ही अतिशय दुःखद घटना आहे. मंगेशकर कुटुंबीयातील दुसरा तारा आशाताई भोसले यांचे दुःखद निधन झाले. ९२ वर्षे त्या जगल्या, त्यातील बहुतांश काळ म्हणजे वयाच्या ५ व्या वर्षापासून त्यांनी संगीताची सेवा केली, ती अखेरच्या श्वासापर्यंत. या देशात सर्वात अष्टपैलू गायिका म्हणून जर कोणाकडे पाहायचे असेल तर त्या आशाताई होत्या, असे फडणवीस म्हणाले.

आशाताईंच्या गायकीच्या वैविध्याबद्दल बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, आशाताईंनी तोरा मन दर्पण कहलाए अशा प्रकारचे शास्त्रीय संगीत म्हटले आणि त्याच वेळी अतिशय आधुनिक खतुबा सारखे गाणे देखील तेवढ्याच लीलया गायले. शास्त्रीय संगीत, पॉप, रॉक, भावगीते असो सगळ्याच प्रकारात त्यांनी आपले कसब दाखवले. त्यांनी २० पेक्षा जास्त भाषांमध्ये गाणी म्हटली. वयाच्या ९० व्या वर्षी तास कॉन्सर्ट करणाऱ्या त्या एकमेव होत्या.

आम्ही जेव्हा त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार दिला, त्यावेळी त्यांनी आपल्या जीवनाचा प्रवास उलगडला. किती खडतर आयुष्य जगत त्या इथपर्यंत पोहोचल्या, हे अत्यंत प्रेरणादायी होते, असेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. आशाताईंच्या स्वभावाचे वर्णन करताना फडणवीस म्हणाले की, त्या अतिशय जिंदादिल व्यक्तिम त्वाच्या होत्या. कोणत्याही कार्यक्रमात त्या आकर्षणाचे केंद्र असायच्या. ९२ व्या वर्षीदेखील त्यांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता, असे त्यांनी सांगितले.

दरम्यान, लता दीदींची १०० वी आम्ही करू शकलो नाही पण आशाताईंची १०० वी निश्चित करू शकू अशी आम्हाला खात्री होती. पण दुर्दैवाने काळाने ती संधी दिली नाही. आशाताईंसारख्या सुविख्यात जगप्रसिद्ध, ईश्वरी आवाज असलेल्या गायीका आमच्यातून निघून गेल्या. मी त्यांनी विनम्र श्रद्धांजली अर्पण करतो. त्याच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सामील आहोत, असे म्हणत त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली.